महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/सा.आ.११७/न.क्र.५६९/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. २२५ दिनांक १४ / ०५ / २००९

विषय : म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना ०१ जानेवारी, २००९ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

वाचा : स.सा.आ.क्र.११७ (क) दिनांक ३१.३.१९८६
प्रशासकीय परिपत्रक क्र.१८५ दि.१८.१०.२००८

......

महाराष्ट्र शासनाने वेळेवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे तत्कालीन म.रा.वि.मंडळाच्या पुनर्रचित महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता शासन निर्णय वित्त विभाग क्र.मभवा-११०९/प्र.क्र.७०/सेवा-९ दि.०२.०५.२००९ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना दि.०१.०१.२००९ पासून सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतनावर ६ टक्के वाढीव दराने म्हणजे १६ % ऐवजी २२ % अशा सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला आहे.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना १०४ % ऐवजी ११० % अशा सुधारित दराने दि.०१.०१.२००९ पासून महागाई भत्ता देण्याबाबत कार्यकारी संचालक (मा.सं) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजुरी दिली आहे.

४. परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केलेल्या सुधारित दरानुसार महागाई भत्त्याची रक्कम महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना माहे मे २००९ पासूनच्या वेतनामध्ये समाविष्ट करुन देण्यात यावी.

५. सदर सुधारित दराने द्यावयाच्या महागाई भत्त्याची दि.०१.०१.२००९ ते ३०.०४.२००९ पर्यंतच्या चार महिन्यांच्या थकबाकीची रक्कम माहे मे २००९ च्या वेतनासोबत अदा करण्यात यावी.

६. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंबंधात विद्यमान तरतुदी व कार्यपध्दती आहे तशाच यापुढेही लागू राहतील.

७. संबंधित अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी महागाई भत्त्याची वाढीव रक्कम प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी, व्यवस्थापक ( वित्त व लेखा - अर्थोपाय विभाग ), हाँगकाँग बँक बिल्डिंग, ४ था मजला, मुंबई - ४०० ०२३ यांचेकडे संपर्क साधावा.

८. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( सु. य. पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
म.रा.वि.वि.कं.मर्या.च्या प्रेषण यादीप्रमाणे.

*K/D.A.Circular-Jan – 2009*